राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन,शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्त,१९२३ द्वारा स्थापित,व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ द्वारा संचालित राज्य वद्यापीठ)

नॅ"क पुर्नमुल्यांन "अ" ग्रेड

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर–४४००३३


---

| | |
|---|---|
| डॉ. डी.के. अग्रवाल | पत्र. क्र. बीसीयुडी/राजा/२०१६/ ३६२ |
| संचालक, (म. वि. वि. म.) | दिनांक :११/०४/२०१६ |

प्रति,

पुनश्:च अंतिम स्मरणपत्र सुधारित

अध्यक्ष/सचिव,

....................................

....................................

**विषय : आपल्या महाविद्यालया विरूद्ध असंलग्नीकरणाची कार्यवाही का सुरू करू नये?**

**संदर्भ :** १) दिनांक ४ मार्च रोजी संपन्न झालेल्या विद्वत परिषदेच्या बाब. क्र. १ वर झालेली चर्चा व निर्णय
२) क्र.म.वि.वि.मं./डीपी/२०१४/८२४ दिनांक १३ ऑगस्ट २०१४.
३) क्र.म.वि.वि.मं./डीपी/२०१४/१०७२ दिनांक ०३ नोव्हेंबर २०१४.
४) क्र. रातुमनावी/म.वि.वि.मं./२०१५/११४९ दिनांक ०९ ऑक्टोबर २०१४.

**महोदय,**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या झालेल्या दिनांक ०३/०३/२०१६ सभे नुसार आपणास कळविण्यात येते की आपले संस्थेद्वारा संचालीत ................................................ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित असल्यामुळे विद्यापीठाची कायदे व धोरणे आपल्यावर बंधनकारक आहेत व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे सुद्धा आपले कर्तव्य आहे.

विद्यापीठात उपलब्ध माहितीनूसार–

संलग्निकरणासाठी किंवा मान्यतेसाठी अर्ज करणारे व्यवस्थापण आणि ज्यांचा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला संलग्निकरण किंवा मान्यता प्रदान करण्यात आली आहे, असे व्यवस्थापण पुढीलप्रमाणे हमी देईल आणि तिचे अनूपालन करेल.

A. अधिनियम आणि त्याखालील परिनियम, आदेश, विनियम यांच्या तरतूदीचे आणि विद्यापीठाच्या स्थायी आदेशांचे आणि निर्देशांचे पालन करण्यात येईल.
B. कलम ८५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संलग्न महाविद्यालयाकरीता तरतूद केलेली एक वेगळी स्थानिक व्यवस्थापण समिती असेल ;
D. विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक असलेल्या इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, पुस्तके वास्तविक, अध्यापन व संशोधनासाठी आवश्यक असणारी साधन सामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यासारख्या योग्य व पर्याप्त सुविधा असतील ;
F. संलग्न महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या अध्यापन व अध्यापनेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वित्तलब्धी, या, विद्यापीठाने विहित केल्याप्रमाणे असतील आणि त्या, अभ्यासाचे पाठयक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन यांच्याकरीता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;
G. संलग्न करून घ्यावयाच्या महाविद्यालयाच्या सर्व अध्यापन व अध्यापनेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि सूविधा या, परिक्षा घेण्यासाठी [1](व मूल्यमापन करण्यासाठी) आणि विद्यापीठाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील;
H. अधिनियम, परिनियम, आदेश व विनियम यांच्या तरतुदींन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, कुलपती,कुलगुरू आणि विद्यापीठाचे इतर अधिकारी यांनी दिलेले निर्देश, आणि आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल;

वरिल सर्व व इतर कारणांमुळे आपल्या महाविद्यालयाचे विद्यापीठाशी असलेले संलग्निकरण विद्यापीठाच्या हितसंबंधाला तसेच त्या द्वारे निर्धारित केलेल्या शैक्षणिक दर्जास बाधा पोहचणारे झालेले आहे. सबब आपल्या महाविद्यालयाचे, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम 81(1) (i) a,b,d,f,g & h नुसार, अटींची पूर्तता न केल्यामुळे व त्यामुळे कलम ९१ नुसार संलग्निकरण का रद्द करण्यात येऊ नये?

याविषयाचे आपले म्हणने पत्र निर्गमीत झालेल्या दिनांकापासून १५ दिवसात विद्यापीठाच्या म.वि.वि.मंडळाच्या कार्यालयात दाखल करावे. आपण तसे न केल्यास आपल्याला याविषयी काही स्पष्टीकरण द्यायचे नाही असे गृहीत धरून असंलग्निकरणची पुढील कार्यवाही केल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आपला,

(डॉ. डी.के. अग्रवाल)
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ